# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २४/०८/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### कन्हान येथील जुगार अड्डयावर धाड
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक २४/०८/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील सत्रापुर रेल्वे फाटक जवळ कन्हान तह पारशिवनी येथे एका घरात काही इसम है तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून जुगाराचा पैशाचा हारजीतचा खेळ खेळत असल्याचे गोपनीय माहिती पथकास प्राप्त झाल्यावरून सदर पथकाने दि २४/०८/२०२२ चे १०.२३ वा. सुमारास मौजा सतरापुर येथे एका घरात सापळा रचुन छापा टाकुन एकुण २४ जुगारी इसम नामे १) अंकित गजानन पाटे रा. पार्वती नगर नागपुर, २) सौरभ ओमप्रकाश गौर रा. संत्रा मार्केट नागपुर ३) राजेश रामचंद्र नंदनवार रा. गोळीबार चौक नागपुर ४) सलमान हारून खान रा मिनीमाता नगर कळमना नागपुर ५) संतोश विनायक वेलतुरकर रा टेलीफोन एक्सचेंज चौक नागपुर, ६) स्वप्नील मनोज समर्थ रा केडी के कॉलेज जवळ नागपुर ७) भावेश नानक खंडवानी रा मेओ हॉस्पीतल नागपुर ८) संतोश बंसीलाल निभरे रा लालगंज खैरीपुरा नागपुर ९) साखीर गफर शेख रा मोमीनपुरा नागपुर १०) आशिश शंकर रामटेके रा शिवाजी नगर नागपुर ११) राजीद गफर शेख रा गिट्टी खदान नागपुर १२) सम्मी खान बहादुर खान रा कुभारपुरा नागपुर १३) आकाश दशरथ खापेकर रा जुनीमंगलवारी नागपुर १४) आकाश जयचंद गुप्ता रा शांतीनगर नागपुर १५) ईवान अन्ना राउत पोलीस लाईन नागपुर १६) अनिकेत विरेंद्र खडसे रा सत्रापुर कन्हान १७) दुर्गेश अनिल वैद्य रा दिघोरी नागपुर १८) जितेंद्र परसराम टकरानी रा जरीपटका नागपुर १९) क्रिशणा विरू खडसे रा कन्हान २०) अशोक रामचंद्र सिर्सीकर रा पाचपावली नागपुर २१) शेख वसीम शेख अखील रा पारडी नागपुर २२) सुरज रघुवीर मेश्राम रा जुनी खल्लाशी लाईन नागपुर २३) डेनियल शेन्डे रा सत्रापुर कन्हान २४) संदीप बुरेले रा महादुला कोराडी नागपुर हे खेळतांना दिसले. त्यापैकी २२ जुगारी इसमांना ताब्यात घेण्यात आले व २ फरार असे एकूण २४ इस्मांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. जुगारी इसमांनी सदर चा जुगार हा डेनियल शेंडे, रा. सतरापुर व संदीप गुरीले, रा. कोराडी हे भरवित असल्याचे सांगितले असून ते दोघेही फरार आहेत. २२ जुगारींना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी २,४६,७२०/—रू., तासपत्ते, १७ मोबाईल संच कि. ३,०४,०००/—रू., एक चार चाकी व एक दुचाकी वाहन की. १४,५०,०००/—रू. व जुगाराचे इतर साहीत्य असा एकुण २०,०१,२४५/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे कन्हान येथे अप.क्र. ४९५/२०२२ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम १०९ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंदवुन आरोपीतांना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे कन्हान हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सफौ चंद्रशेखर घडेकर, पोहवा विनोद काळे, पोना मयूर ढेकळे, अमृत किनगे, रोहन डाखोरे, प्रणय बनाफर, अमोल वाघ, महेश बिसने, चापोशी आशुतोष लांजेवार सुमित बांगडे यांचे पथकाने केली.



## देवलापार पोलीसांनि अवैध गोवंश वाहतुक करणारा पिकअप वाहन पकडून ११ गोवंश यांना जिवनदान

**पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा देवलापार ते चोरबाहुली समोरील टोल नाका एनएच– ४४ रोड येथे दिनांक २३/०८/२०२० चे ०९.०० वा. ते १०.०५ वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–४९/एटी–०५१७ क्रमांकाच्या अशोक ले–लॅन्ड कंपनीचा पिकअप गाडी थांबविन्यास इशारा केला असता ते न थांबता नागपूर च्या दिशेने पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता आरोपी हे चोरबाहुली समोर टोल नाक्यावर वाहन सोडुन पसार झाले. सदर वाहन तपासले असता वाहनात ११(गोवंश) कि. १,१०,०००/–रू. जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून वाहन कि. ४,००,०००/–रू. ११ जनावरे कि. १,१०,०००/–रू. व एक ओपा कंपनीचा मोबाईल कि. १०,०००/–रू. असा एकुण किंमती ५,२०,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार श्री. अशोक उईके, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ११ (१)(डि)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ),९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम १८४, १७९ मोवाका तसेच कलम ४२९ भादवी काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुंजरवाड मो.क्र. ९८२२८८८०५५ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन देवलापारचे ठाणेदार सपोनि प्रविण बोरकुटे यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक केशव पुंजरवाड, पोलीस हवालदार अशोक उईके, पोलीस नायक संदीप नागोसे, मोरेश्वर नागोसे, शिवचरण नागपूरे, रमेश खरकटे, पालीस शिपाई सुर्यप्रकाश वावरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.





## अवैध्य मोहाफुल रसायण साठयावर

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक २४/०८/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुखबीर कडुन मिळालेल्या माहिती वरून साटक शेत शिवारातील नाल्यात मोहाफुल गावठी भट्टीवर रेड केली असता आरोपी याने नाल्याचे काठावर ४ प्लास्टीक ड्रम मध्ये अवैध्यरित्या ८०० लीटर मोहाफुल सडवा रसायन कि. ८०,०००/—रू., ४ ड्रम कि. २,०००/—रू. असा एकुण कि. ८२,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फरार आरोपी नामे— राजु आकरे रा. साटक हा घटनास्थळरवरून पळुन गेला. फरार आरोपी विरूध्द पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ६९ मदाका कायद्यान्वये गुन्हा करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोहवा गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, विपीन गायधने, रोहन डाखोरे यांचे पथकाने केली.

(सदर बामतीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## चोरी

**१) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा सुकळी शिवार येथे दि. २२/०८/२०२२ ते दि २३/०८/२०२२ चे रात्री सुमारास फिर्यादी नामे— अनिल टेकचंद ठाकुर वय ४० वर्ष रा. लोधी पांजरी, पो डोंगरगाव जि. नागपुर यांचे मालकाने शेतात लॉन बनवण्याकरीता लोखंडी पोल लोखंडी जाळी चे बंडल सलाखे हे शेतात आणुन ठेवले होते. फिर्यादी हे ठेक्याने शेत करीत असलेल्या शेतात गेले असता त्यांना १) लोखंडी दहा खंबे की ६००/—रू., २) लोखंडी जाडी २३ बंडल की ४५,०००/—रू., ३) १५ कीलो सलाखी की ९,०००/—रू. असा एकुण कि. ५४,६००/—रू. चा मुद्देमाल दिसुन आला नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने कि. ५४,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठाकुर मो.नं. ८८८८८६२२५७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा आठवळी बाजार मांढळ येथे दि. २३/०८/२०२२ चे ०४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— विष्णु गजाननराव मेश्राम, वय ३७ वर्ष, रा. वैद्य चौक मांढळ यांची पत्नी ही आठवडी बाजाराकरिता मांढळ येथे गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या पत्नीच्या गळातुन १५ ग्रामचा गोप सोन्याचा व गोपामध्ये १.२५ मिली लॉकेट सोन्याचा किंमत एकुण ८०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुधीर ज्ञानबोवार मो नं.८६९८४०७११४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील सावनेर ते नागपूर रोड यश बार समोर सावनेर येथे दिनांक २२/०८/२२ चे १५.३० वा. सुमारास सौ. उमाबाई नारायण दवंडे (मृतक), वय ५० वर्ष, रा. ढालगाव खैरी ही आरोपी नामे– अमोल नारायण दंवडे, वय ३२ वर्ष, रा. ढालगाव खैरी याच्या एमएच– ४०/बीडब्लू– ०२४६ क्रमांकाच्या मोटरसायकलने सोबत डबलसिट बसून नागपुर कडुन सावनेर कडे जात होते. त्यादरम्यान आरोपी मोटरसायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरघाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने मोटरसायकल वर मागे डबलसिट बसलेली महिला हि मोटरसायकल वरुन रोडवर खाली पडली. या अपघातात तिचे डोक्याला मागील बाजूस मार लागून गंभीर जखमी होवून तिचे मरणास आरोपी कारणीभूत ठरला. मर्ग क्र. ६१/२२ कमल १७४ जाफौ चे चौकशी दरम्यान घटनास्थळ पंचनामा इन्कवेस्ट पंचनामा प्रत्यक्ष व इतर साक्षदाराचे बयानात निष्पण झाल्याचे चौकशी अहवालावरुन सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार राजेन्द्र यादव पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दोनोडे मो.क्र. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर :–** दिनांक २२/०८/२०२२ चे ०७.३० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षीय ही कॉलेजला येथे शिकत असुन ती कॉलेजला जाते तसेच नंतर बॅकत जाईल असे म्हणुन बॅकेचे पासबुक व शालेय कागदपत्रे व कॉलेज ची बॅग घेवुन घरून निघाली परंतु ति परत आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री दोनोडे मो.क्र. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावर जलालखेडा स्टेट बॅक ऑफ इंडीया येथे दिनांक २२/०८/२०२२ चे १४.०० वा. ते दिनांक २३/०८/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रितेश शेषराव नागपुरकर, वय ३५ वर्ष, रा. वडविहीरा ता. नरखेड यांची आई सिंधुबाई शेषरावजी नागुपरकर, वय ६१ वर्ष, रा. वडविहीरा यांचे नावाने स्टेट बॅक ऑफ इंडीया जलालखेडा चा खाता आहे. फिर्यादी हे ऐटीएम मधुन पैसे काढण्यास गेले असता त्यांनी अज्ञात आरोपीला विश्वासाने एटीएम कार्ड देवुन त्यातुन २,०००/–रु. काढले. त्यानंतर नमुद आरोपीने ऐटीएम कार्ड बदलुवन फिर्यादीचे एटीएम कार्डचा वापर करुन फिर्यादीचे आईचे खात्यातुन ५३,६५२/–रु. काढुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री मनोज चौधरी मो. नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**